जा.क्र.वि.शा./निवडणूक/१०४५३/२०१७
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा-०१
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- २१/१२/२०१७

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे**
मतदान केंद्राचे १०० मीटरचे परिक्षेत्रातील व्यावसायिक दुकाने व आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता, वेल्हे जि. पुणे या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान होणार आहे. व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी दिनांक २६/१२/२०१७ रोजी उपरोक्त नमुद केलेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदान केंद्राचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये मतदानाच्या दिवशी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये व सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर परिसराचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्रांचे १०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, **रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील अधिकारान्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता, वेल्हे जि. पुणे या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी ०१ मतदान केंद्र (इमारत) व ३ बुथवर १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये दिनांक २६/१२/२०१७ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**१)** ०१ मतदान केंद्राच्या (इमारतीच्या) परिघापासुन १०० मीटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यावसायिक, व्यावसायिक दूकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात.

सदरचा आदेशाची उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.सं.कलम १८८ मधील तरतुदीनूसार कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्कयानिशी आज दिनांक २१/१२/२०१७ रोजी देणेत आला आहे.

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २१/१२/२०१७**

**(रविंद्र कदम)**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर.